# भारत फोर्ज ने मेक इन इंडिया वीक में दिखाया दम



संवाददाता

पुणे. भारत सरकार की ओर से मुंबई में आयोजित मेक इन इंडिया वीक में पुणे की जानी मानी कंपनी भारत फोर्ज ने देश में मैन्युफैक्चरिंग की मिसाल को पेश किया है. कल्याणी ग्रुप की ओर से रक्षा क्षेत्र में काम आने वाले उपकरणों को इस वीक में पेश किया गया.

## पीएम ने किया डिफेंस पवेलियन का दौरा

कंपनी की ओर से डिजीटल मैन्युफैक्चरिंग को इस दौरान पेश किया गया. इसके साथ कंपनी डिफेंस एंड एरोस्पेस, ऑटोमोटिव, रेलवे और ऑइल व गैस क्षेत्र में अपना योगदान देती आ रही है. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने भारत फोर्ज के डिफेंस पवेलियन का दौरा किया और कंपनी द्वारा उठाए गए कदमों की सराहना की. इस समय भारत फोर्ज के चेयरमैन और मैनेजिंग डायरेक्टर बाबा कल्याणी ने कंपनी के उत्पादों के बारे में अवगत कराया.



मेक इन इंडिया वीक सेंटर के डिफेंस पैवेलियन में भारत फोर्ज लि. के बूथ का अवलोकन करते रक्षा मंत्री मनोहर पर्रीकर. साथ में हैं कंपनी के प्रबंध निदेशक बाबा एन. कल्याणी.

संरक्षण क्षेत्रात ५० पेक्षा अधिक सामंजस्य करार

# ‘मेक इन इंडिया’मुळे दरडोई उत्पन्न वाढणार

‘मेक इन इंडिया सप्ताह’ मध्ये आतापर्यंत संरक्षण क्षेत्रात ५० पेक्षा अधिक सामंजस्य करार झाले असून यामुळे हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येण्यास मदत होणार आहे. या गुंतवणुकीमुळे देशात मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होईल, असे प्रतिपादन संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी केले. त्यामुळे हिंदुस्थानातील नागरिकांचा दरडोई उत्पन्नाचा दर १६ टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा सरकारचा मनोदय असल्याचेही त्यांनी सांगितले.

‘मेक इन इंडिया’च्या कार्यक्रमात ते पत्रकारांशी बोलत होते. पर्रीकर म्हणाले की, हा तरुणांचा देश आहे. एकीकडे या तरुणांच्या रोजगाराची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे तर दुसरीकडे कुशल कामगार उपलब्ध होत नाहीत. इतर देशांच्या मानाने हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असताना त्यांना कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. यासाठी ‘स्किल इंडिया’च्या माध्यमातून ‘तरुणांचे कौशल्य विकसित होण्यासाठी त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करण्यात येत आहे. येत्या चार वर्षांत संरक्षण दलात एक लाख कुशल कामगारांची गरज भासणार असल्याचे सांगून पर्रीकर म्हणाले की, कौशल्य विकसित मनुष्यबळामुळे देशातील औद्योगिक विकासाला गती मिळण्यासही मदत होणार आहे. आकाश मिसाईलबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पर्रीकर म्हणाले की, देशी बनावटीचे हे मिसाईल असून या मिसाईलचे उत्पादन वाढविण्यात येणार आहे.



## हिंदुस्थानी सैन्याचा अभिमान

सियाचीनची घटना दुर्दैवी असली तरी मला माझ्या सैन्याचा अभिमान असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले. सैनिकांच्या समस्यांबाबत दरमहिन्याला आढावा घेण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## ६ लाख कोटींची गुंतवणूक : २८ लाख रोजगार

# उद्योगांची पसंती महाराष्ट्रालाच

**मुंबई :** रतन टाटा, दिलीप संघवी, गौतम सिंघानिया, बाबा कल्याणी यांच्यासह देशातील दिग्गज उद्योगपतींनी सोमवारी गुंतवणुकीबाबत त्यांची पहिली पसंती महाराष्ट्रच असल्याचे ठामपणे सांगितले. उद्योगांच्या उभारणीसाठीच नव्हे, तर स्टार्ट अप इंडियासाठी देशातील सर्वात आदर्श राज्य महाराष्ट्रच असल्याचे प्रशंसोद्गार काढत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांना प्रशस्तिपत्र दिले.

शनिवारी सुरू असलेल्या 'मेक इन इंडिया' सप्ताहात आजचा दिवस खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा होता. 'महाराष्ट्र दर्शन' कार्यक्रम आगीच्या भक्ष्यस्थानी पडून काही तासच झाले असताना महाराष्ट्रावर गुंतवणुकीचा अक्षरशः पाऊस पडला. दिवसभरात आज गुंतवणुकीसाठी तब्बल २ हजार २४५ करार झाले.

मुख्यमंत्री फडणवीस, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री पीयूष गोयल आणि वाणिज्य व उद्योगमंत्री निर्मला सीतारामन यांनी उद्योगपतींशी साधलेल्या संवादाचे स्वागत करताना त्यांच्या अंमलबजावणीची हमी दिली. (पान ८ वर)

## पुणे, चाकणला होणार प्रकल्प



आजचा दिवस महाराष्ट्रासाठी सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिवसभरात ६ लाख ९४ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे २ हजार २४५ करार झाल्याची माहिती दिली. त्याद्वारे २८ लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

**प्रमुख गुंतवणूक अशी :** महिंद्रा अँड महिंद्रा - ८ हजार कोटी (नाशिक व चाकण), मर्सिडिज- २ हजार कोटी (चाकण), पंचशील रिअॅल्टी (आयटी पार्क, पुणे), ज्ञान गाल्या- ३९५० कोटी (वर्धा), राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स- ६२०४ कोटी (थळ आणि ट्रॉम्बे), के. रहेजा - ३९५० कोटी, गोदरेज इंडस्ट्रीज- ३ हजार कोटी (खालापूर), अॅसेंडास- ४५७४ कोटी (आयटी पार्क, नवी मुंबई), सुदर्शन केमिकल्स- ११०० कोटी (रासायनिक प्रकल्प पाताळगंगा, जि. रायगड), इकॉनॉमिक एक्स्प्लोसिव्हज लि.- १५५० कोटी (नागपूर), जेएसडब्ल्यू फाउंडेशन- २० हजार कुशल तरुण तयार करणार, उबेर- ५० हजार कुशल तरुण तयार करणार, जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि.- ६ हजार कोटी.

प्रख्यात उद्योगपती बाबा कल्याणी, गौतम सिंघानिया यांनी महाराष्ट्र दर्शन कार्यक्रमात आग लागल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी केलेल्या धावपळीचे कौतुक केले. 'आपण मुख्यमंत्र्यासारखे नाही तर सीईओसारखे वागलात,' अशी पावती सिंघानिया यांनी दिली.

**१७ लाख नव्या रोजगाराची निर्मिती** | जेएसडब्ल्यू कंपनी जयगड बंदरात सहा हजार कोटीची गुंतवणूक करणार

# सहा लाख कोटी गुंतवणुकीचे करार

प्रतिनिधी
मुंबई

आर्थिक गुंतवणुकीसाठी देशात महाराष्ट्र हे सर्वोत्तम राज्य असल्याचे सोमवारी पुन्हा एकदा सिद्ध झाले. 'मेक इन इंडिया' सप्ताहाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात ६ लाख ११ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची घोषणा केली. या गुंतवणुकीतून राज्यात सुमारे १७ लाख नवे रोजगार निर्माण होतील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मैदानात 'मेक इन इंडिया' सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र गुंतवणूक शिखर परिषदेत देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी राज्य सरकार करोबर होणाऱ्या जवळपास अडीच हजार सामंजस्य करारातून ६ लाख ११ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची माहिती दिली. जेएसडब्ल्यू कंपनी रत्नागिरी




महाराष्ट्र गुंतवणूक परिसंवादाच्यावेळी सहभागी झालेले रेल्वेमंत्री सुरेश प्रभू, ऊर्जा मंत्री पियुष गोयल, पर्यावरण मंत्री जावडेकर, रसायन आणि पेट्रोकेमिकल्स राज्यमंत्री हंसराज अहिर आदी.

> महाराष्ट्राच्या विकासात उत्पादन क्षेत्राचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून उद्योगाच्या सुलभीकरणासाठी आपले सरकार कटिबद्ध आहे
>
> **देवेंद्र फडणवीस**
> मुख्यमंत्री

जिल्ह्यातील जयगड बंदरात तब्बल सहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

या परिषदेत गोदरेज अँण्ड बॉईस, सुदर्शन केमिकल्स, के. रहेजा कन्स्ट्रक्शन आणि उत्तम गलवा यांनीही गुंतवणुकीबाबत मोठ्या योजनांची घोषणा केली. याशिवाय राज्य सरकारच्यावतीने पाच नवे उद्योगविषयक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये किरकोळ क्षेत्र, अनुसूचित जाती-जमाती, इलेक्ट्रॉनिक्स, एक खिडकी योजना आणि बंदरविषयक धोरणाचा समावेश आहे.

केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी रस्ते आणि बंदर क्षेत्राचा अंतर्भाव असणाऱ्या पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी

**क्षेत्रनिहाय गुंतवणूक....**

- महिंद्रा अँण्ड महिंद्राची नाशिकमध्ये साडेसहा हजार कोटीची गुंतवणूक
- मर्सिडीज बेन्झ चाकणच्या प्रकल्पात दोन हजार कोटी रुपये गुंतवणार
- थळ प्रकल्पाच्या विस्तारासाठी आरसीएफची साडेपाच हजार कोटीची गुंतवणूक
- रस्ते आणि बंदर विकास क्षेत्रात तीन लाख कोटीची गुंतवणूक अपेक्षित

महाराष्ट्रात तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. डहाणू जवळील वाढवण येथील नवीन ग्रीनफिल्ड बंदर तीन वर्षात पूर्ण केले जाईल. राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीत तिप्पट वाढ होऊन ही लांबी २२ हजार ४४२ किलोमीटर झाल्याची माहिती केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी दिली.

या परिषदेला केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभु, ऊर्जा मंत्री पियुष गोयल, पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर, रसायन आणि पेट्रोकेमिकल्स राज्यमंत्री हंसराज अहिर, उद्योजक रतन टाटा, दिलीप सांघवी, बाबा कल्याणी, सज्जन जिंदाल, जीव्हीके रेड्डी आदी उपस्थित होते.

दरम्यान यावेळी मुंबई-दिल्ली औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत येणाऱ्या शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्राच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. शेंद्रा-बिडकीनचे पुनर्नामकरण आता औरंगाबाद औद्योगिक शहर असे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र में महानिवेश

## राज्य ने साइन किए 6.11 लाख करोड़ रुपये के MOU

Sudha.shrimali@timesgroup.com




■ मुंबई : 'मेक इन इंडिया' वीक के तीसरे दिन तक महाराष्ट्र में 6 लाख करोड़ रुपये के मेमोरेंडम ऑफ अंडरस्टेंडिंग (एमओयू) साइन किए हैं। ये एमओयू 2,560 कंपनियों के साथ साइन किया गया है। इनमें फूड प्रोसेसिंग सेक्टर की भागीदारी सबसे ज्यादा है। सीएम ने बाद में पत्रकारों से बातचीत में कहा, 'हमने नेशनल और इंटरनेशनल कंपनियों से करार किया है। उनके निवेश से 28 लाख लोगों को जॉब मिलने का अनुमान है। अभी तो मेक इन इंडिया के तीन दिन बाकी हैं।'

बड़े उद्योगपतियों ने महाराष्ट्र में 'स्किल कॉरिडोर' के विकास की जरूरत का समर्थन किया। महाराष्ट्र इन्वेस्टमेंट सेमिनार में भारत फोर्ज के चेयरमैन बाबा कल्याणी ने कहा, 'हमें यह समझना होगा कि भविष्य में प्रोडक्शन वहीं होगा, जहां स्किल होगा। इसलिए रीसाइक्लिंग बहुत महत्वपूर्ण है।' सन फार्मा के एमडी दिलीप सांघवी ने कहा कि 70 पर्सेंट फार्मा कारोबार का मैनेजमेंट महाराष्ट्र से होता है, लेकिन मैन्युफैक्चरिंग अन्य राज्यों में होती है। रिलायंस इंडस्ट्रीज के निखिल मेसवानी ने कहा कि मुंबई-पुणे इंटलेक्चुअल कॉरिडोर बनाने की जरूरत है।

### उम्मीदें

▶ सीएम फडणवीस ने दिया 'बिल्ट इन मुंबई' का नारा

▶ रफ्तार पकड़ रहा है मैन्यूफैक्चरिंग सेक्टरः निर्मला सीतारमन

▶ रक्षा खरीद प्रणाली मुक्त और पारदर्शी होने से खरीद लागत 20-25 पर्सेंट तक नीचे आ सकती हैः मनोहर पर्रिकर

▶ 2030 तक बिजली क्षेत्र में करीब 1,000 अरब डॉलर के निवेश की उम्मीदः पीयूष गोयल



" महाराष्ट्र में स्टार्टअप को बूस्ट देने के लिए और रिसर्च सेंटर्स की जरूरत है, परन्तु इनोवेशन को बढ़ावा नहीं मिलेगा। ऐसे औद्योगिक पार्क भी चाहिए, जहां सिलिकॉन वैली जैसी सुविधाएं हों।

\- रतन टाटा, उद्योगपति

# उद्योगांची पसंती महाराष्ट्रालाच

(पान १ वरून) 'भारतातल्या उत्पादन क्षेत्रात आघाडीवर महाराष्ट्र' या विषयावरील चर्चासत्रात उद्योगपती रतन टाटा, सन फार्मास्युटिकल्सचे व्यवस्थापकीय संचालक दिलिप संघवी, रेमंड समूहाचे अध्यक्ष गौतम सिंघानिया, एरिक्सन इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक पाओलो कोलल्ला आणि रिलायन्स इंडस्ट्रिजचे व्यवस्थापकीय संचालक निखिल मेसवानी यांनी विचार व्यक्त केले.

रतन टाटा म्हणाले की, स्टार्ट अप इंडिया अभियान यशस्वी होण्यासाठीची प्रत्येक आवश्यक बाब महाराष्ट्राकडे उपलब्ध आहे. पुढील काळात राज्याच्या विकासाचा विचार करताना सर्वसमावेशकता व्हावे लागेल. कृषी, उत्पादन, सेवा क्षेत्र आणि पायाभूत सुविधांची सांगड घालावी लागेल. मुख्यमंत्री फडणवीस तसा विचार करीत आहेत, ही स्वागतार्ह बाब आहे. ही क्षेत्रे हातात हात घालून चालली तर महाराष्ट्र प्रगतीचे शिखर गाठेल.

फडणवीस म्हणाले, राज्याच्या सकल उत्पादनात शेतीचा वाटा केवळ ११ टक्के आहे तर एकूण रोजगारापैकी ५० टक्के रोजगार या क्षेत्रात आहे. याचाच अर्थ हा भार पेलणार नाही. कृषी प्रक्रिया उद्योग, कृषी विपणनाचे मजबूत जाळे उभे राहणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्राची सांगड उत्पादनक्षेत्राशी घालावी लागेल. गौतम सिंघानिया यांनी फडणवीस सरकारने आपल्या प्रकल्पासाठीच्या मंजुरी केवळ दहा दिवसात दिल्याचा सुखद अनुभव सांगितला. मात्र त्याचवेळी केंद्राशी संबंधित काही न्यायिक विषय अजूनही उद्योगांसाठी अडसर ठरत आहेत ते दूर करण्याची सूचना त्यांनी केली.

(विशेष प्रतिनिधी)

## इंटेलिजन्ट कॉरिडॉर

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे हा न्यू सिलिकॉन व्हॅलीच्या धर्तीवर इंटेलिजन्ट कॉरिडॉर बनावा, अशी सूचना रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेडचे कार्यकारी संचालक निखिल मेसवानी यांनी केली. संशोधनाला चालना देणारे प्रकल्प या मार्गावर यावेत, असे ते म्हणाले. मुंबई-नागपूर सुपर एक्स्प्रेस वे आणि पुणे-नाशिक कॉरिडॉरमध्ये उद्योगांचे मोठे जाळे निर्माण होण्याची संधी आहे, असे त्यांनी सांगितले.

## कल्याणी यांचा आग्रह

उद्योगपती बाबा कल्याणी यांनी मेक इन इंडियामध्ये निर्माण होणाऱ्या ६५ टक्के नोकऱ्या छोट्या व्यवसायांच्या असतील याची माहितीच नसल्याची खंत व्यक्त केली. कौशल्य विकासाचे धोरण आजच्या गरजा पूर्ण करणारे असावे, असे ते म्हणाले. 'किमान शासकीय हस्तक्षेप आणि कमाल कार्यक्षमता' असा सरकारचा दृष्टिकोन असल्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई म्हणाले होते. त्यावर, कल्याणी म्हणाले की सरकार हवेच पण ते तत्काळ निर्णय घेणारे हवे.